हिंदू जागर

ई-पेपर
पीडीएफ
व्हॉट्सअप
आणि सोशल
मीडियावर
शेअर करण्यास
परवानगी आहे!

दैनिक
# हिंदू जागर

हिंदुत्वाचा बुलंद आवाज

मो. 8888009180

संपादक : रोशन ठाकुर

hindujagar@gmail.com

विदर्भाची शान

नागपुर, वर्धा, चंद्रपुर,
गडचिरोली, भंडारा,
गोदिया, यवतमाळ,
अमरावती, अकोला,
वाशिम, बुलढाणा
जिल्ह्यातून एकाचवेळी
प्रकाशित होणारे दैनिक

वर्धा (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी/हिंदी | वर्ष : ०१ | अंक:१०६ | गुरूवार दि.१९ मार्च २०२६ | RNI: MHIL/25/A4400 | किंमत २ रु | पाने ४

WARDHA (MAHARASHTRA | DAILY | MARATHI/HINDI | YEAR - 01 | ISSUE -106 | THURSDAY DT.19 MARCH 2026 | RNI: MHIL/25/A4400 | PRICE-2 RUPEES | PAGES 4


# शेतकऱ्यांच्या पैशावर मृत्यूचा व्यवहार?

## ७५% अनुदानाच्या गाई दुसऱ्याच दिवशी ठार; वर्ध्यात संतापाचा ज्वालामुखी!

दैनिक, हिंदू जागर
रोशन ठाकुर, वर्धा

वर्धा : शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रत्यक्षात कसा बाजार मांडला जातो, याचा संतापजनक आणि धक्कादायक नमुना वर्धा जिल्ह्यात समोर आला आहे. ७५ टक्के अनुदानावर देण्यात आलेल्या दुभत्या गाई दुसऱ्याच दिवशी मृत्यूमुखी पडल्याने संपूर्ण योजनेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाच्या भूमिकेवरही संशयाची छाया गडद झाली आहे.सुकळी येथील शेतकरी रणजित मेश्राम यांना पशुसंवर्धन विभागामार्फत अधिकृत प्रक्रियेनंतर दोन दुभत्या गाई देण्यात आल्या. निवड समितीसमोर पुरवठादार डुकरे यांच्या माध्यमातून या गाई देण्यात आल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी गाईंची तपासणी करून त्या पूर्णपणे निरोगी असल्याचे प्रमाणपत्र दिले होते. मात्र प्रत्यक्षात ही कागदपत्रे किती फोल आहेत, हे दुसऱ्याच दिवशी उघड झाले. कारण दोन्ही गाईंचा अचानक मृत्यू झाला.





या घटनेमुळे लाभार्थी शेतकरी आर्थिक आणि मानसिक दोन्ही स्तरांवर हादरून गेला. निरोगी म्हणून प्रमाणित केलेल्या गाई इतक्या अल्पावधीत मृत्यूमुखी पडणे हे केवळ योगायोग नसून गंभीर निष्काळजीपणा किंवा जाणूनबुजून केलेला गैरप्रकार असल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे.घटना उघड होताच संबंधित अधिकारी आणि पुरवठादार यांच्यात एकच खळबळ उडाली. तातडीने पंचनामा व पोस्टमार्टम करण्यात आले. मात्र यामागे सत्य बाहेर येऊ नये म्हणून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप अधिक तीव्र झाला आहे.

शेतकऱ्याला एक नवीन गाय देण्यात आली असून दुसऱ्या गाईसाठी विमा मार्फत २० दिवसांत नुकसान भरपाई मिळेल असे आश्वासन देण्यात आले. परंतु हे आश्वासन केवळ तोंडदेखले असून संपूर्ण प्रकारावर पडदा टाकण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा जोरात आहे.

या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. योजनेअंतर्गत १,४०,००० इतके अनुदान मंजूर असताना, त्याच शेतकऱ्याकडून २०,००० रोख रक्कम घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. म्हणजेच एकूण १,६०,००० खर्च करूनही निकृष्ट दर्जाच्या गाई देण्यात आल्या. ही सरळसरळ फसवणूक असून शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारल्याचा आरोप होत आहे.या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून निवड समिती, पशुसंवर्धन अधिकारी आणि पुरवठादार डुकरे यांच्या भूमिकेची सखोल तपासणी करावी, संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच पुरवठादाराला तात्काळ काळ्या यादीत टाकावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

तसेच पीडित शेतकरी रणजित मेश्राम यांना तातडीने योग्य आणि पूर्ण नुकसान भरपाई देण्यात यावी, अशीही मागणी पुढे आली आहे.दरम्यान, युवा परिवर्तन की आवाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निहाल पांडे, जिल्हा अध्यक्ष दिनेश परचाके, संपर्क प्रमुख अमित भोसले, शेखर इंगोले, तालुका प्रमुख इरशाद शहा, मनोज कळमकर, उपाध्यक्ष अमन नारायण, प्रशांत पाटील, शुभम निमजे आदी पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे. जर तात्काळ आणि ठोस कारवाई झाली नाही, तर जिल्हा परिषदेसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांच्या नावावर चालणाऱ्या योजनांमध्ये जर अशा प्रकारे निकृष्ट जनावरे पुरवून पैशांचा व्यवहार केला जात असेल, तर हा प्रकार केवळ घोटाळा नसून उघड लूट असल्याची भावना जनतेत व्यक्त होत आहे. आता या प्रकरणात प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, दोषींवर कठोर कारवाई होते का, आणि शेतकऱ्याला न्याय मिळतो का याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# हिंगणघाटमध्ये हिंदू नववर्षाचा जल्लोष उसळणार! भव्य बाईक

## भव्य बाईक रॅलीतून हिंदू शक्तीचे विराट प्रदर्शन; शहर भगवामय होणार

दैनिक, हिंदू जागर
रोशन ठाकुर, वर्धा

हिंगणघाट : हिंदू नववर्षाच्या पावन स्वागतासाठी हिंगणघाट शहर सज्ज झाले असून सकल हिंदू समाजाच्या वतीने आज दिनांक १९ मार्च २०२६ रोजी भव्य आणि दणदणीत हिंदू बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता संघ कार्यालय, संत तुकडोजी महाराज पुतळा येथून या रॅलीची सुरुवात होणार असून संपूर्ण शहर भगवामय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.हिंदू संस्कृती, परंपरा आणि धर्माभिमानाचा ठसा उमटवण्यासाठी आयोजित करण्यात आलेली ही रॅली केवळ एक कार्यक्रम नसून, हिंदू समाजाच्या एकतेचा आणि शक्तीचा विराट आविष्कार ठरणार आहे. जय श्रीराम आणि हर हर महादेवच्या गगनभेदी घोषणांनी हिंगणघाट शहर दुमदुमून जाणार असून भगवे ध्वज हातात घेऊन तरुणाईचा उसळलेला उत्साह शहराच्या प्रत्येक रस्त्यावर पाहायला मिळणार आहे.



या भव्य रॅलीमध्ये पंजाबी ढोलचा कडकडाट, जोशपूर्ण डीजेचा ठेका, आकर्षक सजवलेली बग्गी आणि श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या वेशभूषेत साकारलेले चिमुकल्यांचे मनमोहक सादरीकरण हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. यासोबतच मातृशक्तीचा मोठ्या प्रमाणात सहभाग या रॅलीला अधिक भव्य आणि प्रेरणादायी स्वरूप देणार आहे.या कार्यक्रमाला हिंगणघाट-समुद्रपूर-सिंधी (रेल्वे) विधानसभा क्षेत्राचे आमदार समीरभाऊ कुणावार, नगरपालिकेच्या नगराध्यक्षा नयना उमेश तुळसकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर संघचालक विनोद नांदूरकर तसेच शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शिवव्याख्याते राजा महाराज शेंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी विहिपचे जिल्हा मंत्री शरद कोणप्रतिवार, गजानन मसाये, देवा वाघमारे, बजरंग दलचे प्रशांत तिवारी, दीपक शर्मा, राम नक्के, संदीप नासरे, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हाध्यक्ष रोशन नागमोते, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष भूषण पिसे तसेच शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख अमित गावंडे यांसह अनेक कार्यकर्ते सक्रियपणे पुढाकार घेत आहेत. सकल हिंदू समाजाच्या वतीने सर्व हिंदू बांधव, भगिनी, युवक आणि युवतींना मोठ्या संख्येने या ऐतिहासिक बाईक रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हिंदू नववर्षाचे स्वागत उत्साह, अभिमान आणि एकतेच्या जाज्वल्य वातावरणात करून हिंदू शक्तीचे प्रभावी दर्शन घडवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# नंबर प्लेट काढून पोलिसांना चकवा? अखेर चोरच जाळ्यात अडकला!

दैनिक, हिंदू जागर
रोशन ठाकुर, वर्धा

वर्धा : शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत असतानाच वर्धा शहर पोलिसांनी जोरदार कारवाई करत एका अट्टल दुचाकी चोराला बेड्या ठोकल्या आहेत. नंबर प्लेट काढून पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न करणारा अनुराग प्रविण धाबर्डे, वय २०, रा. तळोदी (कुटकी), ता. सेलू, जि. वर्धा अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला.ही घटना १२ मार्च २०२६ रोजी गोपुरी चौक, नागपूर रोड परिसरात घडली. फिर्यादी सुरेंद्र रामचंद्र महाकाळकर, वय ५१ यांनी आपली सुजुकी कंपनीची बर्गमॅन ग्रे रंग, क्रमांक एमएच-३२ एक्यू ९९७० घरासमोर लॉक करून ठेवली होती. घरात कोणी नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली. सायंकाळी परतल्यानंतर गाडी जागेवर नसल्याचे लक्षात येताच सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरी स्पष्ट झाली आणि तक्रार दाखल करण्यात आली.



तपास सुरू असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे १७ मार्च रोजी विसावा चौक परिसरात पोलिसांनी सापळा रचला. विना नंबरची बर्गमॅन घेऊन फिरणाऱ्या संशयिताला अडवून चौकशी केली असता सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपीने अखेर गुन्ह्याची कबुली दिली.चोरी लपवण्यासाठी आरोपीने गाडीची नंबर प्लेट काढून टाकली होती आणि ती स्वतः वापरत होता. पोलिसांनी पंचासमक्ष सुमारे ४५,००० रुपयांची मोपेड जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाधमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वर्धा शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार भुसारी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद रासकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड, पोलीस हवालदार महेंद्र पाटील, अभिजित वाघमारे तसेच पोलीस अंमलदार रंजित भुरसे आणि अमोल साळवन यांनी ही धडाकेबाज कामगिरी बजावली. दुचाकी चोरी करून पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी हा स्पष्ट इशारा आहे. वर्धा पोलिसांचा सापळा आता अधिक धारदार झाला आहे!

# गिरडमध्ये पुन्हा अवैध गॅस सिलेंडर वाहतूक उघड

## पाठलाग करून वाहन पकडले, १९ सिलेंडर जप्त



दैनिक हिंदु जागर
प्रतिनिधी सचिन वाघे

गिरड : गिरड परिसरात अवैध गॅस सिलेंडर वाहतुकीचा प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. पोलिस व पुरवठा विभागाने संयुक्त कारवाई करत वाहनाचा सिनेमाटाईल पाठलाग करून १९ रिकामे सिलेंडर जप्त केले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नागपूर जिल्ह्यातील नांद येथील भारत गॅस एजन्सीकडून गिरड परिसरात ९६५ रुपयांचा सिलेंडर तब्बल ११०० रुपयांना विक्री होत असल्याचा प्रकार १५ मार्च रोजी हिमांशु विवेक डेकाटे यांच्या व्हिडिओतून समोर आला होता. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच १८ मार्च रोजी पुन्हा अवैध सिलेंडर वाहतुकीची माहिती पुरवठा विभागाला मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पुरवठा विभागाने पोलिसांसह सापळा रचून गिरड-सिरसी रोडवर एमएच ४० एके १८२२ या वाहनाचा पाठलाग केला. कारवाईची चाहूल लागताच वाहन चालकाने वाहन पळवण्याचा प्रयत्न केला. मात्र वाहन गिरड येथे वळवून गॅस पॉईंट नसलेल्या सुरेश गिरडे यांच्या घरासमोर थांबविण्यात आले.तपासणीदरम्यान वाहनात १९ रिकामे सिलेंडर आढळून आले. चालक विष्णू घरत याने ग्राहकांचे रिकामे सिलेंडर एजन्सी पॉईंटवर नेऊन भरलेले सिलेंडर आणण्यासाठी नेत असल्याचे सांगितले. दरम्यान, तालुका पुरवठा अधिकारी कमलेश कुमरे यांनी पंचनामा करून सुमारे ४१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त सिलेंडर समुद्रपूर येथील गॅस पॉईंटवर जमा करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.



# संपादकीय

## ‘मागा’सांची मोहक मरगळ!

सर्वप्रथम भारत सरकारचे अभिनंदन. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरीपणाचा पुरेसा अनुभव घेतल्यानंतर आणि इराण–इस्रायल युद्धात ते स्वत:चे कसे हसे करून घेत आहेत हे पाहिल्यानंतर भारत सरकारने अमेरिकेशी होत असलेला व्यापार करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला हे उत्तम झाले. मनाच्या वेगवेगळ्या अवस्थेत एखादा मद्यपी वेगवेगळे बोलतो तसे काही ट्रम्प यांचे झाले असावे. आधीच त्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने आयातशुल्काच्या मुद्द्यावर ट्रम्प यांस चांगलीच चपराक लगावली. तिचे वळ दिसू नयेत म्हणून ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारक नेतान्याहू यांना साथ दिली आणि इराणविरोधात अकारण युद्ध सुरू केले. तसे केले तर केले; पण ते थांबवायचे कोणत्या मुद्द्यावर हे त्यांनाच माहीत नाही. आता हे अध्यक्ष महाशय म्हणतात इराणकडून ओमान, सौदी, दुबई, कतार, इराक यांना लक्ष्य केले जाईल असे वाटले नव्हते. इराणच्या ताकदीचा अंदाज यायला जगातील एकमेव महासत्तेच्या या प्रमुखास दोन आठवडे आणि हजारोंचा जीव घ्यावा लागला. जागतिक अर्थव्यवस्था, स्थैर्य आदींच्या गळ्यास नख लावल्यानंतर आता इतर देशांनी मदतीस यावे अशी हाक ते देतात. अशा वेळी भारताने धैर्य दाखवले आणि ‘‘एकदा काय ते आयातशुल्काचे ठरवा; मग व्यापार करार करू’’, अशी भूमिका घेतली. हे शहाणपण निश्चितच अभिनंदनीय.

आपल्या देशाच्या अंगावरील महासत्तापदाची वस्त्रे पुरती फेडून त्या देशाच्या इभ्रतीस पुरते नागवे केल्याखेरीज अध्यक्ष ट्रम्प शांत बसणार नाहीत; असे दिसते. ही अवदसा ओढवून घेणे हे पाप अमेरिकनांचे. त्यात आपला काही वाटा नाही. आपला त्या आधी गेल्या निवडणुकीत ‘अगली बार’चा अगोचरपणा करून झाला. पण त्या वेळी ट्रम्प यांना अमेरिकेने दूर ठेवले. या वेळी आपण तसे काही केले नाही. असे असताना या देशाचा आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे अध्यक्ष ट्रम्प यांच्या लहरीपणाचा किती दबाव आपण घ्यायचा हा प्रश्न होता. त्याचे उत्तर मिळत नसल्याने आपल्या व्यापार–उदिमाचा जीव टांगणीस लागणे साहजिक. आधी रशियाकडून आपण तेल खरेदी करतो म्हणून ट्रम्प यांनी ५० टक्के आयातशुल्काचा बडगा आपल्यावर उगारण्यास कमी केले नाही. आपल्या पंतप्रधानांशी त्यांची कथित दोस्ती या कामी आली नाही. हे ५० टक्के आयातशुल्क अमेरिकेच्याच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केल्यानंतर ट्रम्प जमिनीवर आले आणि आयातशुल्क १० टक्क्यांवर घसरले. तरी ट्रम्प बधले नाहीत. ते त्यांनी १५ टक्क्यांवर नेण्याचा निर्णय घेतला. या सगळ्यात आपला व्यापार करार लटकला तो लटकलाच. आर्थिक करार–मदारांसाठी एक निश्चित आणि स्पष्ट धोरण दिशा असावी लागते. ट्रम्प यांच्याबाबत नेमकी तीच बोंब. आजचे उद्याला राहत नाही आणि उद्याचे परवास; अशी स्थिती. अशा परिस्थितीत निश्चित एका कराराने आपल्या देशातील उद्योगांस बांधून ठेवणे धोक्याचे होते. अमेरिकेशी होणारा हा करार स्थगित करून आपण तो टाळला. कररचनेविषयी भूमिका स्पष्ट करा; मगच व्यापार करार करू ही आपली भूमिका अत्यंत योग्य. मलेशिया, युरोपीय देश आदींनीही अमेरिकेसंदर्भात अशीच भूमिका घेतली.

तसेच यापेक्षा अधिक कौतुकास पात्र ठरतात ती युरोपीय राष्ट्रे. त्यांनी ट्रम्प यांची मदतीची याचना नुसतीच धुडकावून लावली असे नाही. तर त्यानंतर अमेरिकेस ‘तुमचे तुम्ही पाहून घ्या’, असेही बजावण्यास कमी केले नाही. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि एवढेच नव्हे तर ‘उजव्या विचारांच्या’ आणि म्हणून ट्रम्प यांस जवळच्या गणल्या जाणार्या इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही ट्रम्प यांच्या हाती हात देण्यास नकार दिला. होर्मुझची सामुद्रधुनी जलवाहतुकीसाठी मुक्त ठेवायची असेल तर युरोपीय देशांनी अमेरिकेस मदत करायला हवी, नपेक्षा ‘नेटो’ (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) या संघटनेचे काही खरे नाही, असा इशारा ट्रम्प यांनी दिला. तो युरोपीय देशांनी साफ धुडकावला. वास्तविक एके काळी अमेरिका आणि युरोपीय देश या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारखे होते. पण ट्रम्प यांनी आपल्या कृत्यांनी ‘नेटो’स दुखावले. रशिया–युक्रेन युद्धात त्यांनी पहिल्यांदा ‘नेटो’चा हात सोडला आणि ही संघटना जणू अमेरिकेमुळेच चालत असल्यासारखी फुशारकी मारली. ती आता त्यांच्या अंगाशी येताना दिसते. ‘‘युद्ध सुरू करताना ट्रम्प यांनी आम्हाला त्याची कल्पनाही दिली नाही. त्याबाबत आमची मते काय हे जाणून घ्यायची गरज कधी त्यांना वाटली नाही. असे असताना आता ते अडचणीत येत असताना आम्ही सक्रिय मदत करावी अशी अपेक्षा करतात. ती कशी काय पूर्ण करणार?’’, असा सूर या युरोपीय नेत्यांनी ट्रम्प यांच्या मदत–मागणीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना लावला. तो खचितच उत्साहवर्धक म्हणायला हवा. ‘‘इराणची तत्कालीन राजवट जाणे गरजेचे होते हे खरे. पण म्हणून बाहेरून बॉम्ब फेकून त्यांना नामशेष करणे हा मार्ग असूच शकत नाही. इतिहासात असे प्रयत्न अयशस्वी ठरल्याचे अनेक दाखले आहेत’’, असे स्पष्ट मत ट्रम्प यांच्या उद्योगावर जर्मनीचे फ्रेडरिक मर्झ यांनी जाहीरपणे व्यक्त केले. इंग्लंडचे पंतप्रधान किएर स्टार्मर यांनीही अशीच भूमिका व्यक्त केली आणि सुरू असलेल्या युद्धात आम्ही उगाच पडणार नाही, असे जाहीर केले. ‘हे युद्ध आमचे नाहीच’, अशी स्पष्ट भूमिका युरोपने या संदर्भात घेणे हे दोन अर्थाने महत्त्वाचे.

एक म्हणजे हे युरोप हा अमेरिकेच्या सावलीतून बाहेर येऊ पाहत असल्याचे हे लक्षण. गेली काही वर्षे अमेरिका आणि युरोप यांत विविध मुद्द्यांवर संघर्ष होत असून आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर अमेरिका कायम युरोपचा आवाज बंद करण्यात यशस्वी ठरली आहे. त्यात पंचाईत अशी की अलीकडे विविध दुकाने ‘एकावर एक’ मोफतची शक्कल आपल्या उत्पादन विक्रीसाठी करतात. अमेरिकेचे तसे आहे.

# विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात गारपीट अन् पावसाची हजेरी

## रब्बी हंगामातील पिकांसह फळबागांना फटका, बळीराजा हवालदील



दैनिक हिंदु जागर

मंबई : राज्यात सध्या उन्हाचा चटका वाढलेला असतानाच आता हवामानातही मोठी उलथापालथ झाल्याचे चित्र बघायला मिळतंय. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला राज्याच्या अनेक भागांत गारपीटसह पावसानं (थशरींहशी णविरींश) हजेरी लावली आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रासह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये (थशरींहशी णविरींश) गारपिटीसह पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. (थशरींहशी णविरींश) अचानक आलेल्या या पावसाच्या सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांच्या शेतातली पिकांना बसला आहे. त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास पावसानं हिरवाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.बीड तालुक्यातील नेकनूर मांजरसुंबा परिसरात वादळी वाऱ्यासह तुफान अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. या पावसामुळे धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रोडवर गुडघाभर पाणी साचले होते. त्यामुळे वाहनधारकांची तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार तब्बल पाऊण तास पावसाची हजेरी होती. या पावसाने रब्बी हंगामासह फळबागांना फटका बसण्याची शक्यता आहे.

गोंदियाच्या मोरगाव अर्जुनी तालुक्यातील शिरोली महागाव परिसरात अचानक वादळी वारा व गारपिटसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मका पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील काही भागांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली होती. हवामान विभागाचा हा अंदाज खरा ठरला असून गोंदिया जिल्ह्याच्या मोरगाव अर्जुनी तालुक्यातील महागाव शिरोली परिसरात अचानक गारपटीसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे मका पिकाला फटका बसण्याची शक्यता असून धान पिकाला या पावसाचा फायदा होणार आहे. अचानक आलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

सांगोला तालुक्यातील जुनोनी जुजारपूर वगैरे परिसरात गेले दोन तासापासून तुफानी गारांचा पाऊस सुरू असल्याने द्राक्ष आंबा आणि डाळिंबाचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या दोन तासापासून मेघगर्जनेसह गारांचा अक्षरशः सडा सर्वत्र पडत असून यामुळे शेतातील द्राक्षांचे मणी फुटले आहेत, तर डाळिंबाचा मोहोर गळून पडला आहे. त्याशिवाय फळाला आलेल्या केशर आंब्याचे ही मोठे नुकसान झाले असून अनेक कैऱ्या पडून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेला गहू आणि शेतातून उतरवलेल्या ज्वारीलाही याचा मोठा फटका बसला आहे. काल (१८ मार्च) सायंकाळी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यानंतर या गाराच्या पावसाला सुरुवात झाली. दरम्यान डिकसळ येथे एका झाडावर वीज पडून झाड भस्मसात झाल्याची माहिती समोर आली आहे.

# वाघोलीत ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा शानदार शुभारंभ

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत उद्घाटन

दैनिक हिंदु जागर

पुणे : वाघोली येथे ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ उत्साहात पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याचे उद्घाटन ’मातृशक्ती’च्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरविकास व परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.उद्घाटन प्रसंगी बोलताना सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध कुस्ती परंपरेचा गौरव केला. खेळाडूंनी प्रामाणिकपणे खेळ सादर करून राज्याचा झेंडा जागतिक स्तरावर उंचावावा, असे आवाहन त्यांनी केले. स्पर्धेचे भव्य आयोजन केल्याबद्दल आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांचेही त्यांनी कौतुक केले.

पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी हा सोहळा महिलांच्या कर्तृत्वाचा उत्सव असल्याचे नमूद केले. कुस्तीला जागतिक स्तरावर अधिक प्रसिद्धी मिळणे आवश्यक असून, खेळाडूंना योग्य सुविधा पुरवण्यावर भर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी यंदाच्या स्पर्धेत महिलांचा लक्षणीय सहभाग असल्याचे सांगितले. सुमारे चार हजार महिलांनी सहभाग नोंदवला असून, कुस्तीविषयीचा दृष्टिकोन बदलण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे पाटील म्हणाले.या स्पर्धेची परंपरा स्वर्गीय कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी सुरू केली होती. त्यांचा वारसा पुढे नेत यंदाची स्पर्धा स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी येथे आयोजित करण्यात आली आहे.स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी विजेत्याला फॉर्च्युनर गाडी, उपविजेत्याला स्कॉर्पिओ, सुवर्णपदक विजेत्यांना १८ बुलेट आणि रौप्यपदक विजेत्यांना स्प्लेंडर गाड्या देण्यात येणार आहेत. १८ ते २२ मार्चदरम्यान रंगणाऱ्या या स्पर्धेकडे राज्यभरातील कुस्तीप्रेमींचे लक्ष लागले आहे. वाघोलीतील नागरिकांसाठी हा सोहळा अविस्मरणीय ठरत आहे.

# पोलिस शिपायाची गळफास लावून आत्महत्या

दैनिक हिंदु जागर

मुंबई : मुंबईच्या सांताक्रुझ वाकोला पोलिस कॅम्प परिसरात एका पोलिस शिपायाने प्रेम प्रकरणातून गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कलिना पोलिस मुख्यालयाच्या हद्दीत घडलेल्या या घटनेमुळे पोलिस दलात मोठी खळबळ उडाली असून, घटनास्थळी सापडलेल्या सुसाईड नोटमधून या आत्महत्येमागचे विदारक कारण उघड झाले आहे.

आत्महत्या केलेल्या या पोलिस शिपायाचे नाव भैय्यासाब भीमराव व्हावळे (वय ३२) असून ते मूळचे परभणीचे रहिवासी होते. त्यांची ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई पोलिस दलात चालक पदावर नुकतीच नियुक्ती झाली होती. आपल्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी प्रेयसीच्या कुटुंबीयांकडून वारंवार होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलल्याचे नमूद केले आहे. या घटनेमुळे पोलिस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस शिपाई भैय्यासाब व्हावळे यांनी १५ मार्च रोजी कलिना प्रशिक्षण केंद्रात गळफास लावून आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ७ फेब्रुवारी २०२६ रोजीच त्यांची पोलिस दलात नियुक्ती झाली होती, मात्र अवघ्या महिनाभरातच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये भैय्यासाब यांनी आपल्या मृत्यूला जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावे स्पष्टपणे नमूद केली आहेत. नांदेडच्या हदगाव येथील एका तरुणीसोबत त्यांचे प्रेमसंबंध होते, मात्र तिच्या कुटुंबीयांचा या नात्याला तीव्र विरोध होता. तरुणीच्या आई–वडिलांनी भैय्यासाब यांना जीवे मारण्याची आणि नोकरीवरून सस्पेंड करण्याची धमकी देत त्यांचा प्रचंड मानसिक छळ केला होता. तसेच तरुणीचे लग्न दुसरीकडे लावण्याचे ठरवून ’तू आत्महत्या कर, नाहीतर तुझी नोकरी घालवू’ अशी धमकीही दिल्याचे सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून त्यांनी आपले जीवन संपवले असून, याप्रकरणी भैय्यासाब यांच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून वाकोला पोलिसांनी तरुणीच्या आई–वडिलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# अंशकालीन महिला परिचरांच्या मानधनात दुप्पट वाढ, दरमहा मिळणार ६ हजार रुपये

दैनिक हिंदु जागर

हिंगोली : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या अंशकालीन महिला परिचरांच्या मासिक मानधनात दुप्पट वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. १ एप्रिल २०२६ पासून ६ हजार रुपये मानधन मिळणार आहे.

राज्यातील आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन महिला परिचर गाव पातळीवर, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागात प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मदत करतात. तसेच आरोग्य विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचविण्यातही त्या महत्वाची भूमिका बजावत असतात. त्यांच्या कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व संघटना कडूनही होत होती.या परिचरांना २०१९ च्या शासन निर्णयानुसार दरमहा ३ हजार रुपये मानधन अदा करण्यात येत होते. महिला परिचरांच्या कामाचे बदलते स्वरूप, आरोग्य सेवेतील वाढती भूमिका आणि वाढत्या महागाईचा विचार करता आरोग्य विभागाने पुढाकार घेऊन महिला परिचरांच्या मासिक मानधनात ३ हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, आता त्यांना सध्याचे तीन हजार आणि प्रस्तावित वाढ तीन हजार रुपये असे एकूण सहा हजार रुपये मासिक मानधन १ एप्रिल २०२६ पासून देण्यात येणार आहे.सर्व जिल्हा परिषदांनी अंशकालीन महिला परिचरांना प्रचलित कार्यपद्धतीनुसार सुधारित मासिक मानधन देण्याची कार्यवाही करावी. तसेच दरमहा १० तारखेपर्यंत मासिक मानधनाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यभरातील अंशकालीन महिला परिचर यांच्याकडून समाधान व्यक्त होत आहे.

# सांगोल्यात दहावीच्या पेपर चोरीचा छडा; विद्यार्थ्यानेच टाकला होता प्रश्नपत्रिकांवर डल्ला

दैनिक हिंदु जागर

सांगोला: सांगोला येथील सांगोला विद्यामंदिर शाळेतून दोन दिवसांपूर्वी चोरीला गेलेल्या दहावीच्या भूगोलाच्या ५० प्रश्नपत्रिका शोधण्यात पोलिसांना अखेर यश आले असून, याप्रकरणी त्याच केंद्रावर परीक्षा देणाऱ्या एका विधी संघर्ष ग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याचा धक्कादायक सहभाग उघड झाला आहे. विशेष म्हणजे, हे कृत्य करणारा विद्यार्थी स्वतः दहावीत शिकत असून आज भूगोलाचा पेपर दिल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या शोधमोहिमेचा आज असा नाट्यमयरीत्या शेवट झाला असून, या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

भूगोलाचा पुरेसा अभ्यास झाला नसल्यामुळे या विधी संघर्षग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याने प्रश्नपत्रिका चोरी केल्याची कबुली पोलिसांच्या चौकशीत दिली आहे. आपल्या पालकांसमोर दिलेल्या जबाबात त्याने सांगितले की, चोरी करण्यापूर्वी त्याने केंद्रावरील स्ट्राँग रूमची पद्धतशीर पाहणी केली होती आणि त्यानंतर पहाटे दोनच्या सुमारास इलेक्ट्रिक बाईकवर इलेक्ट्रिक कटर घेऊन तो शाळेत पोहोचला. कटरच्या साहाय्याने कुलूप तोडून त्याने भूगोलाच्या प्रश्नपत्रिकांचे दोन गठ्ठे आणि तीन कोऱ्या उत्तरपत्रिका लंपास केल्या. घरी पोहोचल्यावर त्याने त्यातील एक गठ्ठा फोडून प्रश्नपत्रिकाही पाहिली होती, अशी धक्कादायक माहिती या तपासातून समोर आली आहे.

सांगोला पोलिसांनी आज या विधी संघर्षग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याकडून चोरीला गेलेल्या ५० प्रश्नपत्रिका, ३ कोऱ्या उत्तरपत्रिका, इलेक्ट्रिक कटर आणि गुन्ह्यात वापरलेली इलेक्ट्रिक बाईक हस्तगत केली आहे. या चोरीच्या घटनेमुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात आणि राज्यात मोठी खळबळ उडाली होती. काल याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर आजचा पेपर होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र शिक्षण मंडळाने रात्री उशिरा नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच परीक्षा घेण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यानुसार, आज राज्यातील सर्व केंद्रांवर दहावीचा शेवटचा भूगोलाचा पेपर सुरळीतपणे पार पडला. पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत असे समोर आले आहे की, प्रश्नपत्रिका चोरणाऱ्या या विद्यार्थ्याने त्याचा इतर कोणाशीही शेअर करून गैरवापर केला नव्हता, ही प्रशासनासाठी मोठी दिलासादायक बाब ठरली. केवळ स्वतःचा अभ्यास झाला नसल्याच्या कारणातून त्याने हे कृत्य केले होते. आता कायदेशीर प्रक्रियेनुसार या विधी संघर्षग्रस्त बालकास उद्या बाल न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे. या प्रकरणाच्या यशस्वी तपासामुळे दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अनिश्चिततेवर अखेर पडदा पडला आहे.

(कोर्ट मॅरेज) * सरकार मान्य * (रजिस्टर मॅरेज)
शिव वैदिक विवाह मंगल कार्यालय
मसाळा, वर्धा.
आमच्या येथे हिंदू धर्माच्या व बौद्ध धर्माच्या रीतीरीवाजाने
जातीय तसेच आंतरजातीय विवाह (लग्न) लाऊन दिले जातात.
तसेच लग्न लाऊन दिल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले जातात.
पत्ता : नालवाडी - मसाळा रोड, नागसेन नगर समोर, गुरूदेव मोटर्स जवळ, मसाळा, वर्धा
संचालक : रोशन ठाकुर
मो. 8888009180 / 7809491491

लग्नास लागणारे आवश्यक कागदपत्रे
1) मुला व मुलीचा जन्माचा दाखला किंवा लिव्हिंग सर्टिफिकेट
2) मुलाचे व मुलीचे आधार कार्ड.
3) मुलाचे व मुलीचे 4/4 पासपोर्ट फोटो.
4) तीन साक्षदार व त्यांचे आधार कार्ड किंवा इलेक्शन कार्ड.
* नियम : विवाहाचे वेळी वराचे वय 21 वर्ष व वधूचे वय 18 वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.
संचालक : रोशन ठाकुर मो. 8888009180 / 7809491491

दैनिक हिंदू जागर
हिंदुत्वाचा बुलंद आवाज
मो. 8888009180
संपादक : रोशन ठाकुर



# सिंदी नगर परिषदेची अतिक्रमण हटाव मोहीम वादाच्या भोवऱ्यात

## बड्यांना अभय तर गरिबांवर हातोडा?

## मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसात तक्रार

## राजकीय दबावापोटी कारवाई केल्याचा आरोप

दैनिक हिंदू जागर
दिनेश घोडमारे

सिंदी (रेल्वे): स्थानिक नगर परिषदेच्या वतीने आज, १८ मार्च रोजी शहरातील पोलीस स्टेशन ते बाजार चौकापर्यंतच्या अतिक्रमणावर बुलडोझर चालवण्यात आला. मात्र, या मोहिमेत नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप करत, 'बड्यांना अभय आणि गरिबांवर हातोडा' अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. विशेष म्हणजे, या कारवाईदरम्यान झालेल्या वादामुळे मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली आहे.

कारवाईची सुरुवात सकाळी ११ वाजता बाजार समितीसमोरील दुकानांपासून झाली. पथक बसस्थानक परिसरात पोहोचताच सुधाकर वाघमारे यांच्या अतिक्रमणावरून मोठा पेच निर्माण झाला. वाघमारे यांनी १९९४ चा दिवाणी न्यायालयाचा आदेश दाखवत, माझी जागा विक्रीपत्राप्रमाणे मोजून द्या, अशी मागणी लावून धरली. यामुळे मुख्याधिकारी पौर्णिमा गावित आणि वाघमारे यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. सुमारे दीड तास परिसरात तणावाचे वातावरण होते. न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशामुळे पोलिसांनी सुरुवातीला पुढाकार घेतला नाही, मात्र राजकीय दबावापोटी मुख्याधिकाऱ्यांनी काही बांधकाम पाडल्याचा आरोप करत वाघमारे यांनी सिंदी पोलिसांत तक्रार दिली आहे.

बाजार चौकातील काही दुकानदारांनी स्वतःहून अतिक्रमण काढण्यासाठी एक दिवसाचा वेळ मागितला, जो प्रशासनाने लिखित संमती घेऊन मंजूर केला. या अतिक्रमण करवाईमध्ये ठाणेदार नरेंद्र निस्वादे, पीएसआय ज्ञानोबा पळनाटे, पीएसआय ओम कालेगुरवार यांच्यासह पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. उर्वरित अतिक्रमण सोमवार, २३ मार्च रोजी काढण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी पौर्णिमा गावित यांनी स्पष्ट केले आहे.





### नगरसेविकेच्या पतीच्या हॉटेलला 'नोटीस'च नाही!

एकीकडे सामान्य दुकानदारांवर कारवाई होत असताना, सत्ताधारी नगरसेविकेचा पती अमोल बोंगाडे यांच्या हॉटेलसमोरील टिन शेडच्या अतिक्रमणाकडे मात्र प्रशासनाने सोयीस्कर दुर्लक्ष केले. याबद्दल मुख्याधिकाऱ्यांना विचारणा केली असता, त्यांना नोटीस पोहोचली नाही, असे अजब उत्तर मिळाल्याने प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

प्रशासनाने न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून राजकीय दबावात ही कारवाई केली आहे. आम्हाला न्याय मिळेपर्यंत आम्ही लढा देऊ.
सुधाकर वाघमारे
तक्रारदार सिंदी (रेल्वे).

# पोक्सो कायदा तथा बालविवाह प्रतिबंधाबाबत मागदर्शन

## जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजन

## शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती

दैनिक हिंदु जागर

चंद्रपूर : जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्या वतीने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात बीजीएम कार्मेल अकादमी येथे मंगळवारी पोक्सो कायदा तथा बालविवाह प्रतिबंध आणि महिला बालविकास विभागाच्या योजनांवर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुलकर्णी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुधीर इंगळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मिनाक्षी भस्मे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे, उपशिक्षणाधिकारी गणेश येरणे, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बारसकर, सदस्या ज्योत्स्ना मोहितकर, वनिता घुमे, बीजीएम कार्मेल अकादमीचे प्राचार्य जेसन जेकब, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी पुलकित सिंह म्हणाले, बालक देशाची संपत्ती असून बालकाचे संरक्षण आपली प्रथम जबाबदारी आहे. बालकांच्या संरक्षणासाठी शासन प्रशासन तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली भूमिका संवेदनशीलपणे पार पाडावी, असे आवाहन केले. मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुलकर्णी, यांनी मार्गदर्शन करतांना, बालकांची सुरक्षितता ही अत्यंत महत्वाची असून सर्वांनी कायद्याला अनुसरून कार्यवाही केलीच पाहिजे.




यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय व पोलिस यांना सहकार्य करावे. सुधीर इंगळे यांनी बालविवाह व पोक्सो कायदा समजावून सांगितला व बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांच्या जबाबदारीविषयी मार्गदर्शन केले. तसेच ग्राम/वार्ड बाल संरक्षण समितीची भूमिका विषद केली. प्रास्ताविकातून मिनाक्षी भस्मे यांनी, बालकांच्या कार्यक्षेत्रात कार्य करणारे अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी सदर कार्यशाळा महत्वाची असून सर्व संबंधित यंत्रणेने समन्वयाने कार्य करून चंद्रपूर जिल्हा बालविवाह मुक्त तसेच बालस्नेही बनविण्याचा संकल्प करू या असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन कल्पना राजुरकर यांनी तर आभार अजय साखरकर यांनी मानले. यावेळी विधी अधिकारी अनिल तानले, परिविक्षा अधिकारी अतिशकुमार चव्हाण, अभिषेक मोहुर्ले, शशिकांत मोकाशे, जिल्हा व रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सखी वन स्टॉप सेंटर, रूद्या संस्था आदींनी मोलाची भुमिका बजावली.

# आखाती युद्धाचा फटका; वाडेगाव-तामसी परिसरातील केळी उत्पादक संकटात

## निर्यात ठप्प झाल्याने केळीचे दर कोसळले; बागायतदारांवर आर्थिक संकट

दैनिक हिंदु जागर
प्रतिनिधी : संतोष काळे

मध्यपूर्वेतील युद्धजन्य तणावाचा थेट फटका आता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू लागला असून बाळापूर तालुक्यातील वाडेगाव-तामसी परिसरातील केळी उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. आखाती देशांमध्ये होणारी केळीची निर्यात अचानक ठप्प झाल्याने केळीचे दर मोठ्या प्रमाणात घसरले असून काढणीस आलेले पीक कमी भावात विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे लाखो रुपयांची गुंतवणूक केलेल्या केळी बागायतदारांमध्ये चिंता व हतबलतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

बाळापूर तालुक्यातील वाडेगाव-तामसी परिसर दर्जेदार केळी उत्पादनासाठी ओळखला जातो. या भागातील केळीला देशांतर्गत बाजारपेठेबरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही मोठी मागणी आहे. विशेषतः इराण, इराक, ओमान, यूएई तसेच व्हिएतनामसारख्या देशांमध्ये येथील केळीची निर्यात होत होती. या निर्यातीमुळे स्थानिक शेतकऱ्यांना चांगला दर मिळत होता आणि शेतीतून आर्थिक स्थैर्य मिळण्याची आशा निर्माण झाली होती.यंदा तामसी येथील युवा शेतकरी मिथुन काळे, अमोल काळे आणि गजानन ढोरे यांनी सुमारे २०० टन केळीचे तीन कंटेनर व्हिएतनामला पाठवून निर्यातीची नवी दारे उघडली होती. दर्जेदार उत्पादनामुळे या केळीला परदेशातून पुढील मागणी येण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, मध्यपूर्वेत वाढलेल्या युद्धजन्य तणावामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार साखळीवर परिणाम झाला आणि निर्यात प्रक्रियेला अचानक ब्रेक लागला.निर्यात बंद पडताच व्यापाऱ्यांनी खरेदी कमी केल्याने काढणीस तयार असलेली केळी शेतातच पडून राहण्याची वेळ अनेक शेतकऱ्यांवर आली आहे. परिणामी शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेतच कमी दरात केळी विकावी लागत असून त्यातून मोठे आर्थिक नुकसान होत आहे. केळी उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोठा खर्च केला आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम केवळ आंतरराष्ट्रीय राजकारणापुरता मर्यादित राहत नसून त्याचे पडसाद ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही उमटत असल्याचे या घटनेतून स्पष्ट होत आहे. त्यामुळे शासनाने केळी उत्पादकांना तातडीने आर्थिक मदत देऊन पर्यायी बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली असताना एक क्विंटल केळीला सुमारे १,८५० रुपये दर मिळत होता. मात्र आखाती देशांतील युद्धामुळे निर्यात बंद पडल्याने केळीचे भाव मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. सध्या व्यापारी फक्त १,०५० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्याची तयारी दाखवत असल्याने शेतकऱ्यांना लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे केळीची निर्यात ठप्प झाली आहे. त्यामुळे केळीचे दर मोठ्या प्रमाणात घसरले असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.
- गजानन ढोरे, युवा शेतकरी, तामसी

# चंद्रपूर जिल्ह्यातील 9597 घरकुलांसाठी 44 कोटींची मंजुरी

## गरिबांना हक्काचे घर देण्यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा फलदायी

दैनिक हिंदु जागर

चंद्रपूर : 'घर म्हणजे केवळ घर नसतं असल्या जरी चार भिंती तरी जगण्यासाठी विणलेलं एक सुंदर स्वप्न असतं'. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीवर जीवापाड प्रेम करणारे, जिव्हाळा जपणारे राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आता हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. गरिबांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेला निवारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत मान्यता देण्यात आलेल्या घरकुलांसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ९५९७ लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, या घरकुलांसाठी तब्बल ४४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करून निधी उपलब्ध करून दिला आहे.

या मंजुरीसाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा करत गरजू कुटुंबांना हक्काचे घर मिळावे यासाठी प्रभावी प्रयत्न केले. त्यांनी वारंवार पत्रव्यवहार तसेच प्रत्यक्ष संवाद साधत या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेण्यास शासनाला भाग पाडले. विशेष म्हणजे, या प्रश्नाच्या गांभीर्याची जाणीव करून देण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चा उपस्थित करत गरीबांना हक्काचे घर मिळावे यासाठी ठाम आणि आग्रही भूमिका मांडली होती. त्यांच्या या पाठपुराव्यामुळेच जिल्ह्यातील ९५९७ कुटुंबांच्या आयुष्यात नवा प्रकाश निर्माण झाला आहे.यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना ही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सुरक्षित, सन्मानजनक आणि स्थिर निवारा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असून, या योजनेमुळे हजारो कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होणार आहे. या निर्णयामुळे केवळ घरकुलांची उभारणीच नव्हे, तर गरिबांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सामाजिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, ९५९७ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करून दिल्याबद्दल आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे सर्व स्तरांतून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# गुढीपाडवा : शेतकरी संस्कृतीतील नववर्षाची नवी आशा

दैनिक हिंदु जागर
प्रतिनिधी : सचिन वाघे

हिंगणघाट : महाराष्ट्रात गुढीपाडवा हा केवळ सण नसून नव्या वर्षाची, नव्या आशेची आणि नव्या सुरुवातीची घोषणा मानला जातो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा होणारा हा दिवस हिंदू नववर्षाचा पहिला दिवस मानला जातो. ग्रामीण भागात विशेषतः शेतकरी समाजासाठी गुढीपाडव्याला अत्यंत महत्त्व आहे. कारण हा दिवस केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून शेती संस्कृतीशी जोडलेला प्रेरणादायी सण आहे.शेतकरी वर्षभर निसर्गावर अवलंबून राहून अथक परिश्रम करत असतो. रब्बी हंगामाची कापणी सुरू होण्याच्या काळात गुढीपाडवा येतो. त्यामुळे हा दिवस शेतकऱ्यांसाठी समाधानाचा आणि नव्या नियोजनाचा असतो. शेतातील मेहनतीचे फळ हाती येण्याची वेळ जवळ येते आणि पुढील खरीप हंगामाची तयारीही मनात सुरू होते. म्हणूनच गुढीपाडवा हा शेतकऱ्यांसाठी नव्या कृषी वर्षाची सुरुवात मानली जाते.




या दिवशी घरासमोर उभारलेली गुढी विजय, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानली जाते. गुढी उभारून कुटुंबातील सदस्य देवपूजा करतात, नवीन पंचांगाचे वाचन करतात आणि वर्षभर सुख, समृद्धी तसेच भरघोस पीक येण्यासाठी प्रार्थना करतात. ग्रामीण भागात शेतकरी आपल्या शेतीची साधने, बैलजोडी आणि शेतातील देवस्थान यांचीही पूजा करतात. यातून निसर्ग आणि शेतीबद्दलची कृतज्ञता व्यक्त होते.आजच्या आधुनिक युगातही गुढीपाडव्याचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम या सणातून दिसून येतो. शहरांमध्ये गुढीपाडवा सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि विविध उपक्रमांनी साजरा केला जातो, तर ग्रामीण भागात तो शेती आणि निसर्गाशी नाते दृढ करणारा सण म्हणून जपला जातो. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ नववर्षाचा प्रारंभ नसून शेतकरी संस्कृतीचा अभिमान, परंपरेची ओळख आणि नव्या आशेचा संदेश देणारा सण आहे. नव्या वर्षात शेती समृद्ध व्हावी, शेतकऱ्यांचे जीवन सुखी व्हावे आणि समाजात आनंद व ऐक्य नांदावे, हीच या सणामागची खरी भावना आहे.



# मजूर व महिला सहकारी संस्थांना मिळणार बळ,मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

## मजूर संस्थांसोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना कामे देण्यासाठी शासन सकारात्मक

मुंबई : राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे राज्यातील मजूर सहकारी संस्था सोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना शासनाच्या विविध कामांमध्ये अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली. सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढवणे तसेच कामांचे पारदर्शक व न्याय्य वाटप सुनिश्चित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी या विषयाचा सखोल अभ्यास करून व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी ५ सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला.



बैठकीदरम्यान ना. पंकज भोयर यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार केला. या बैठकीस सहकार विभागाचे सचिव, उपसचिव नितीन गायकवाड, अप्पर निबंधक डॉ. पी. एल. खंडागळे, जिल्हा उपनिबंधक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनीही सहभाग नोंदवला.बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मजूर सहकारी संस्था सोबतच प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना शासनाच्या विविध कामांमध्ये संधी देण्याची ठाम भूमिका मांडली. या दोन्ही संस्थांना अधिक कामे मिळाल्यास त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्थानिक रोजगारनिर्मिती होईल, असे त्यांनी अधोरेखित केले. तसेच सहकाराच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी महिला सहकारी संस्थांना प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आ. मुनगंटीवार यांच्या या भूमिकेला प्रतिसाद देत सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मजूर सहकारी संस्था सोबतच यापुढे प्राधान्याने महिला सहकारी संस्थांना देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची ग्वाही दिली. राज्यात विविध यंत्रणांमार्फत १० लाख रुपयांपर्यंतची कामे, ई–निविदा पद्धतीद्वारे मिळणारी कामे तसेच जिल्हा परिषद स्तरावरील कामे मजूर सहकारी संस्थांना दिली जातात. या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी आ. मुनगंटीवार यांनी कामांचे वाटप अधिक पारदर्शक करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित केली. त्यानुसार ई–निविदा पद्धतीद्वारे व जिल्हा परिषदेमार्फत मजूर संस्थांना देण्यात आलेल्या कामांची माहिती जिल्हा उपनिबंधक स्तरावर संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व कामांची ऑनलाइन नोंद अनिवार्य करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. सदर विषयाचा सखोल अभ्यास करून व्यवहार्य धोरण निश्चित करण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार ५ सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावर सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. समितीने लवकरात लवकर अहवाल सादर करावा आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

---

## नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जीविका मंगेश कोडापे ठरली प्रथम विद्यार्थीनी



दै. हिंदू जागर
प्रतिनिधी/राहुल नागपुरे

गहाणकुंड येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी कुमारी जीविका मंगेश कोडापे इयत्ता पाचवी हिने नुकत्याच जाहीर झालेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा यादीत ८४% गुणासह गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. गुणवत्ता यादीत स्थान मिळवून नवोदय विद्यालयाचा प्रवेश तिने पक्का केला आहे, याबद्दल जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा गव्हांकुंड ,शाळा व्यवस्थापन समिती. दोघांकडून ग्रामपंचायत व गव्हांकून ग्रामवासीया तर्फे कुमारी जीविका व तिच्या पालकांचे खूप खूप अभिनंदन. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे जीविका ही गव्हाणकुंड गावातून नवोदय विद्यालयामध्ये पात्र झालेली प्रथम विद्यार्थी ठरली आहे त्यामुळे सर्वच स्तरातून तिचे विशेष कौतुक होत आहे. या गुणवत्ता यादीमध्ये अव्वल येऊन तिने सर्वांना हेच दाखवून दिले की जिल्हा परिषद शाळा कुठेही कमी नाही. तिने आपल्या यशाचे श्रेय तिच्या पालकांना व तिच्या वर्गशिक्षिका कु. ममता मनोज भाकरे मॅडम व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ रमा राजेंद्र जरुडकर व शाळेतील संपूर्ण शिक्षक वृंद यांना दिले आहे.

---

## राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ला दुचाकीची जबर धडक

### दोघांचा मृत्यू तर एक गंभीर जखमी

चिमूर : – भारतात सर्वत्र रस्ता सुरक्षा अभियान मोहीम परिवहन विभागामार्फत राबविण्यात येत असून मोठ्या प्रमाणावर अजूनही नियमाची पायमल्ली करून वाहने सर्रास सुरु आहे. याचाच एक जिवंत उदाहरण चिमूर शहरात दिनांक. १८/०३/२०२६ ला सकाळी वेळ ९ ते १० वाजताच्या सुमारास नगर परिषद चिमूर तर्फे सफाई अभियान नियमित राबविणारे खाजगी कंत्राटदाराचे ट्रॅक्टर नेहमी प्रमाणे राष्ट्रीय महामार्गावर नियमबाह्य पद्धतीने रोड दुभाजकाला लागून उभे केल्याने हा अपघात घडला.

सविस्तर नेहरू चौक येथील महामार्गावरील रोड दुभाजकाला अगदी लागुण ट्रॅक्टर मुंडा क्रमांक. चक ४० ङ ५५०९ व ट्रॅक्टर ट्रॉली क्रमांक. चक ३४ इत ७३६५ उभी केली असतांना मागून येणाऱ्या ट्रिपलसीट दुचाकीने जोरदार धडक दिली यामध्ये दुचाकी चालकाचे घटनास्थळी मृत्यू झाले असून दुचाकी क्रमांक. चक३४ –थ ८५८७ या दुचाकीवर मधोमध बसलेल्या इसमाचे नागपूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला तर पाठीमागे बसलेल्या तिसऱ्या इसमावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहे.




दुचाकी स्वारांची नाव – (१) चालक प्रथमेश मनोहर मेश्राम वय २४ वर्षे राहणार नेताजी वार्ड चिमूर, ( मृतक ), (२) प्रशांत अभिमन शंभरकर वय ३९ वर्षे राहणार कवडशी ( रोडी ) चिमूर, उपचारादरम्यान मृत्यू , (३)उत्तम रंगाराव रामटेके वय ५० वर्षे राहणार कवडशी ( रोडी ) चिमूर, अती दक्षता विभागात उपचार सुरु आहे. तर ट्रॅक्टर चालक उस्मान खाँ छोटू खाँ पठाण वय ६० वर्षे राहणार नेताजी वार्ड चिमूर असे आहे.या घटनेची चिमूर शहरात सर्वत्र चर्चा रंगू लागली असून नगर परिषद चिमूर चे कंत्राटदार यांनीही नियम धाब्यावर बसवून सर्रास कृषी उपयोगी ट्रॅक्टर वाहणाने नगर परिषद क्षेत्रातील घनकचरा उचल करणे करीता उपयोगी लावले. हे प्रकार बघता नगर परिषद चिमूर यांनी कंत्राटदार यांनी कशाप्रकारची वाहने कंत्राट पूर्ण करण्यासाठी वापरावी याबाबत ची माहिती दिली असावी परंतु निविदेतील नियमावलीचा योग्य वापर न करता सर्रास नियमाची पायमल्ली केली गेली.

यात नजर चुकीने हा अपघात घडला असावा तरी चिमूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक चिमूर , प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी या घटनेची पुरेपूर चौकशी करून कंत्राटदारावर वाहन चालकावर व वाहन मालकावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी जनतेकडून केली जात आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांचे मार्गदर्शनात पोलीस पथक करीत आहे.

---

## सेलू येथे रंगणार राज्यस्तरीय शंकरपटाचा थरार, कृषी महोत्सवाचा होणार कार्यक्रम

दैनिक हिंदु जागर
राजेश वरटकर

सेलू : दिवंगत नरहरीपंत कोटंबकार पाटील यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ साहसिक जनशक्ती संघटना व मित्र परिवारातर्फे राज्यस्तरीय शंकरपट व कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.गुढिपाडवाच्या शुभमुहूर्तावर दि. १९ मार्चला महोत्सवाचे उद्घाटन होईल. शंकरपटाचा कार्यक्रम सेलु –वडगांव रोडवरील संताजी मंदिर कार्यालय जवळील प्रकाश खडसे, धनराज खडसे व बालु सोनटक्के यांच्या शेतात आयोजित करण्यात आला आहे. तब्बल १२ लाख ५० हजार रुपयांच्या बक्षिसांची लुट होणार आहे.

श्रुती वाळके शंकरपटात राहणार महिला धुरकरीया महोत्सवात ३५० फूट सेकंदाचा पट 'अ' व 'ब' गटात, तसेच १३०० फूट सेकंद व जोडदानीचा पट अशा विविध प्रकारच्या स्पर्धा होणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून अमरावती येथील महिला धुरकरी कु. श्रुती वाळके उपस्थित राहणार असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे.उद्घाटन सोहळ्याला यांची राहणार उपस्थिती शंकरपट उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी खासदार अमर काळे राहणार असुन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी आमदार दादाराव केचे, आमदार समीर कुणावार, आमदार सुमित वानखेडे, आमदार राजेश बकाणे तसेच माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चु कडु प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहणार आहेत. गावातील परिसरातील नागरिकांची उपस्थिती राहणार आहे. थैमान नाटकाच्या सादरीकरणातून होणार महोत्सवाची सांगता महोत्सवाचा समारोप २७ मार्च रोजी होणार आहे. या दिवशी वडसा येथील एकता नाट्य रंगभूमीच्या 'थैमान' या नाटकाच्या दमदार सादरीकरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे. राज्यस्तरीय शंकरपट व कृषी महोत्सवाला परिसरातील शेतकरी, बैलगाडामालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक रवींद्र कोटंबकार व शंकरपट आयोजन समिती अध्यक्ष भुषण उर्फ बंटी वाघमारे यांनी केले आहे.

---

## नारखेड अमरावती रेल्वे मार्गावर मोवाड जवळ अपघात

### संत्रा तोडीकरिता घेऊन जाणारा पिकप पलटी २७ मजूर जखमी १९ गंभीर

दैनिक हिंदु जागर
तालुका प्रतिनिधी राहुल नागपुरे

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्याच्या मोवाळ येथील वर्धा नदीलगत नारखेड अमरावती रेल्वे मार्गाजवळ सोमवारी सकाळी संत्रा तोळीकरिता घेऊन जाणाऱ्या मजुरांच्या पिकप ला भीषण अपघात झाला वाहन उलटल्याने एकूण २७ मजूर जखमी झाले असून त्यापैकी १९ मजुरांची प्रकृती गंभीर आहे त्यांना तातडीने पुढील उपचारार्थ नागपूर मेडिकल येथे पाठविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार वरुड तालुक्यातील जरूड बाहादा व इसबरी गावातील ३९ मजूर संत्रा तोडीच्या कामाकरिता पिकप वाहन क्रमांक चक२७एक्स ७७३९ मध्ये बसून नरखेड तालुक्यातील बेलोना येथे जात होते दरम्यान नरखेड तालुक्यातील मोवाड येथील वर्धा नदीलगत नारखेड अमरावती रेल्वे मार्गाजवळ पिकप चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पिकप वाहन अचानक रस्त्यावरून घसरून पलटी झाला.



परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी मजुरांना पिकअप वाहनातून बाहेर काढले त्यानंतर सर्व जखमींना मोवाळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून प्राथमिक उपचारानंतर काहींना वरुड ग्रामीण रुग्णालय तर अतिगंभीर रुग्णांना पुढील उपचारार्थ नागपूर येथे रेफर करण्यात आले.

वरुड मोर्शी मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी तात्काळ संपर्क साधून जखमी मजुरांच्या उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आज दिनांक १८ मार्चला वरुड मोर्शी मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी नागपूर येथे मेडिकल मध्ये जाऊन सर्व जखमींची स्वतः भेट घेत उपचार व्यवस्थित चालू आहे की नाही हे पाहण्याकरता नागपूर येथे दाखल झाले आहे.

त्यामध्ये ही इसबरी बहादा येथील मजूर असून त्यांच्या कुटुंबाची सुद्धा देवेंद्र भुयार यांनी भेट घेतली. आणि आज नागपूर येथे मेडिकल ला जाऊन सर्व जखमींची भेट घेऊन सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. यावरून आमदार देवेंद्र भुयार यांची मानवता दिसून आली.

दैनिक हिंदू जागर
हिंदुत्वाचा बुलंद आवाज
मो. 8888009180 संपादक : रोशन ठाकुर

"दैनिक, हिंदू जागर"
ह्या वृत्तपत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार, प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे. आपण इच्छुक असाल तर खाली दिलेल्या नंबर वरती कॉल किंवा व्हाट्सअप्प करू शकता.

संपर्क : मुख्य संपादक - रोशन ठाकुर
दैनिक, हिंदू जागर
मो. 8888009180

'HINDU JAGAR' DAILY PERIODICAL IS OWNED BY ROSHAN SOHANSING THAKUR, PUBLISHED BY ROSHAN SOHANSING THAKUR, PRINTED BY CLASSIC PRINTERS NEAR POLICE STATION, GANDHI CHOWK, STATION ROAD, BHANDARA AND PUBLISHED AT 69, DNYANESHWAR NAGAR, MASALA, WARDHA, MAHARASHTRA-442001 EDITOR- ROSHAN SOHANSING THAKUR, MOB. 8888009180 OWNERS AND EDITORS DO NOT NECESSARILY AGREE WITH THE VIEWS EXPRESSED IN THIS ISSUE. (IN CASE OF ANY DISPUTE, COMPLAINT UNDER WARDHA COURT)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक रोशन सोहनसिंग ठाकुर यांनी क्लासिक प्रिंटर्स, पोलीस स्टेशन जवळ, गांधी चौक, ता. जि. भंडारा, महाराष्ट्र ४४१९०४ येथे छापून कार्यालय दैनिक, हिंदू जागर ६९, ज्ञानेश्वर नगर, मसाळा, ता. जि. वर्धा, महाराष्ट्र ४४२००१ येथे प्रकाशित केले. संपादक : रोशन सोहनसिंग ठाकुर (सर्व वाद विवाद वर्धा न्यायालय अंतर्गत) मो. ८८८८००९१८०